# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 20.11.2024** **वार – बुधवार**

---

**मतदान**

विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी पुणे जिल्ह्यातील 21 जागांसाठी आज दुपारी 5 वाजेपर्यंत 54 पूर्णांक 709 टक्के मतदान झाल्याची माहिती निवडणूक यंत्रणेकडून देण्यात आली. तत्पूर्वी सकाळी 9 वाजेपर्यंत 5 पूर्णांक 53 टक्के तर दुपारी 1 वाजेपर्यंत 29 टक्के मतदानाची नोंद झाली होती.

विधानसभा निवडणुकीसाठी आज पुणे शहरात सकाळपासून उत्साहात मतदान झालं. रस्त्यांवर तरूण तरूणींकडून हातात फलक घेऊन नागरिकांना मतदान करण्याचं आवाहन करण्यात येत होतं. विशेषतः या निवडणूकीत गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये मतदान केंद्राची स्थापना केली होती. त्यामुळं अनेक नागरिकांना मतदान करणं सोयीचं झाल्याचं पाहायला मिळालं. दिव्यांगांसहित ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रशासनानं चांगली सोय केली असल्याने अनेकांनी मतदान उत्स्फूर्तपणे केलं. मदतान केंद्रावरही राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, स्वयंसेवक संघटना, सामाजिक संस्था, प्रबोधन मंच यांच्यामार्फतही मतदारांना त्यांची नावं शोधून देण्यापासून मतदान केंद्रांपर्यंत पोहोचवण्यासाठी मदत करण्यात येत होती. परदेशातून खास मतदानासाठी काही नागरिक उत्साहानं आले होते. पुणे शहरात मतदाना दरम्यान दिवसभरात कोणतीही अनुचित घटना घडली नाही. मतदान शांततेत पार पडलं.

भारताचे पहिले पॅरालिम्पिक पदक विजेते पद्मश्री पुरस्काराने सन्मानित मुरलीकांत पेटकर यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये आपला मतदानाचा हक्क बजावला. शिरूर विधानसभा मतदार संघामध्ये 104 वर्ष वयाच्या आजीनी केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावला.

खडकवासला विधानसभा मतदारसंघात दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही उत्साहात सहभाग नोंदवला. वृद्ध आणि आजारी मतदार आशा कापरे यांनी रुग्णवाहिकेतून येऊन मतदानाचा हक्क बजावला.

सर्वच मतदारसंघांमध्ये युवा मतदारांनी पहिल्यांदाच मतदानाचा हक्क बजावल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर कर्त्तव्याची भावना झळकत होती. मतदानानंतर त्यांनी आपले छायाचित्र देखील काढून घेतले.

विभागीय आयुक्त डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांनी निवडणुकीचा हक्क बजावला. जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी 210 कोथरूड विधानसभा मतदार संघांतर्गत पाषाण इथल्या मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क

बजावला; तसंच तिथले अधिकारी, कर्मचारी आणि मतदारांशी संवाद साधला. जिल्हा नियंत्रण कक्षातून डॉक्टर सुहास दिवसे निवडणूक प्रक्रियेवर सीसीटीवी कॅमेऱ्यांच्या माध्यमातून लक्ष ठेवून होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आज पिंपरी इथल्या मतदान केंद्रावर जाऊन सपत्नीक मतदान केलं.

कसबा पेठ विधानसभा मतदार संघात घोरपडे पेठ इथल्या महात्मा गांधी उर्दू शाळेत एका मातेनं नवजात शिशुसोबत उत्साहानं मतदान केलं. अशा मातांसाठी ठिकठिकाणी पाळणाघराचीही व्यवस्था करण्यात आली होती. कसबा पेठ विधानसभा मतदार संघातच बोरडाळी इथल्या महाराणा प्रताप प्राथमिक विद्यालयात परदानशीन मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली होती. परदानशीन महिलांनी त्याचा लाभ घेतला.

शिवसेनेचे उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सहकुटुंब थेरगाव इथं मतदानाचा हक्क बजाविला.

पुणे जिल्ह्यातील 21 विधानसभा मतदारसंघात 8462 मतदान केंद्रं होती. राज्यातील ही सर्वाधिक मतदान केंद्रसंख्या आहे. जिल्ह्यात 303 उमेदवार रिंगणात आहेत. 60 गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये 126 मतदान केंद्रं उभारण्यात आली होती. तर 267 मतदान केंद्रं झोपडपट्टी भागात होती.

जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे 6 लाख 63 हजार 622 मतदार चिंचवड विधानसभा मतदारसंघात आहेत, तर सर्वात कमी म्हणजे 2 लाख 83 हजार 635 मतदार कसबा पेठ मतदारसंघात आहेत.

**<u>वाहतूक</u>**

मुंबई बंगलोर महामार्गावर आज मोठ्या प्रमाणात मतदारांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. खेड शिवापूर पथकर नाक्याच्या अलीकडे पाच ते सात किलोमीटर वाहनांच्या रांगा लागलेल्या होत्या.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात सकाळच्या वेळी चांगली थंडी जाणवते. दिवसा उन्हही असतं. उद्या आकाश निरभ्र राहील. कमाल 31 अंश तर किमान 13 अंश सेल्सियस तापमानाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**